**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: संकिर्ण-२०२२/प्र.क्र.३९६/सेवा-५
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई
ई-मेल: archana.walzade@nic.in
दिनांक :- २९ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

आयुक्त, आरोग्य सेवा,
आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.

विषय : **पीएचडी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी परवानगी मिळणेबाबत.**

संदर्भ : उपसंचालक (शुश्रृषा) आरोग्य सेवा, मुंबई यांचे जा.क्र.संआसे/शुश्रृषा/कक्ष-९/टे-४/पीएचडी नर्सिंग/३१४७/१३, दि.१४.०७.२०२३ चे पत्र.

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने उपसंचालक (शुश्रृषा) आरोग्य सेवा, मुंबई यांनी पीएचडी नर्सिंग या अभ्यासक्रमासाठी परवानगी मिळण्याबाबत तसेच सदर अभ्यासक्रमासाठी शासनस्तरावरुन मार्गदर्शक सूचना तसेच निवड नियमावली निर्गमित करण्याबाबत विनंती करण्यात आली होती.

त्यानुसार पीएचडी नर्सिंग या अभ्यासक्रमासाठी सेवेत असलेल्या अनेक अर्हताधारक पाठयनिर्देशिका, अधिपरिचारिका यांच्याकरीता पीएचडी नर्सिंग अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शक सूचना तसेच नियमावली खालीलप्रमाणे आहेत:-

क. पीएचडी (नर्सिंग) करीता प्रवेशित महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ/अभ्यास केंद्र हे शासन, युनिव्हर्सिटी ग्रॅट कमिशन (युजीसी ), भारतीय परिचर्या परिषद यांचेशी संलग्न तसेच मान्यता असणे अनिवार्य आहे.

ख. पीएचडी (नर्सिंग) संशोधनाचा विषय हा युजीसी मानांकाप्रमाणे Socially Relevant /Locally need based / Nationally important / Globally signigicant /Contribute to create value to the society or in cutting edge areas or new/additional knowledge in the area of emerging concerned worldwide असावा व सार्वजनिक आरोग्य सेवेकरीता उपयुक्त असावा.

ग. पीएचडी (नर्सिंग) च्या प्रवेश परिक्षा / CET पूर्वी आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांची परवानगी व ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

घ. विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे पीएचडी प्रवेशपत्र व त्याबाबतचे मान्यता प्राप्त अधिसूचित संस्था याबाबत आयुक्त / उपसंचालक (शुश्रृषा) कार्यालय प्रमुख स्तरावर कळविण्यात यावे.

ङ. ज्या कार्यालय स्तरावर सेवांतर्गत उमेदवाराची पीएचडी (नर्सिंग) बाबतची नस्ती तयार करुन ठेवावी

व त्यामध्ये सर्व कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावी.

च. आयुक्त यांनी पीएचडी नर्सिंग करीता परवानगी देताना त्यांचे अधिनस्त उमेदवारांचे सेवा तपशिल, प्रवेशाच्या लगतचे ५ वर्षाचे गोपनीय अहवाल उत्कृष्ट व त्यावरील दर्जाचे असावे.

छ. त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची दिवाणी,फौजदारी गुन्हा नसावा किंवा कोणतीही विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नसावी.

ज. वरील सर्व अटी आणि शर्तीची पुर्तता होत असल्याबाबत संबंधीत कार्यालयाप्रमुखांनी खातरजमा करुनच त्यांना सदर अभ्यासक्रमाचे ना-हरकत प्रमाणपत्र सहआयुक्तालयाकडे संबंधीतांच्या अर्जा व गोपनीय अहवालासह संपूर्ण प्रस्ताव सादर करावे.

झ. संशोधनाकरीता महाराष्ट्र शासनाच्या संस्थेमध्ये अथवा शासकिय कर्मचारी यांच्याबाबत संशोधन करतांना Institutional Ethical committee समोर synopsis सादर करावे लागणार व संस्थेची परवानगी घ्यावी लागेल. तसेच त्याबाबतचा गोषवारा ( synopsis) या कार्यालयास सादर करावे.

ञ. पीएचडी (नर्सिंग) हा अंशकालीक (Part time) अभ्यासक्रम असल्यामुळे एखाद्या संस्थेमधून ३ टक्केपेक्षा जास्त एमएसस्सी (नर्सिंग) उमेदवार पीएचडी (नर्सिंग) करीता इच्छुक असल्यास सेवा ज्येष्ठतेनुसार परवानगी देण्यात यावी, म्हणजे संस्थेचे कामकाज प्रभावित होणार नाही.

ट. पीएचडी (नर्सिंग) प्रवेशप्रकियेचा निकाल आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना तात्काळ कळविण्यात यावा.

ठ. पीएचडी (नर्सिंग) प्रवेश प्रकिया संपल्यानंतर संशोधन कशाप्रकारे व कोणत्या कालावधीमध्ये पुर्ण करणार त्याबाबतची माहीती आयुक्त व उपसंचालक (शुश्रृषा) यांचे मार्फत आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना देण्यात यावी, व त्याची प्रत आयुक्तालयास उपसंचालक यांचे मार्फत कळवावी.

ड. संशोधनाकरिता एखाद्या संस्थेकडून आर्थिक सहाय ( Research Grant ) मिळवायचे असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव विहीत मार्गाने पुर्वपरवानगी करिता संबंधीत उपसंचालक मंडळ यांना सादर करावा व तशी परवानगी घेण्यात यावी.

ढ. नियोजित कालावधीमध्ये मानंकाप्रमाणे पीएचडी (नर्सिंग) पुर्ण केल्यानंतर उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आयुक्तालयामार्फत व उपसंचालक मार्फत कार्यालयीन कामकाजाकरीता नावापुढे डॉक्टरेट पदवी लावण्याकरीता संशोधन Abstract सह आयुक्तालयास सादर करावे.

ण. सदर शैक्षणिक कार्यक्रम हा अंशकालीक (Part time) आहे. यास्तव, संबंधितांनी यापूर्वी अध्ययन रजा घेतली नसल्यास अथवा अध्ययन रजेपैकी रजा शिल्लक असल्यास ती रजा अन्यथा संबंधितांच्या खाती असलेल्या ४५ दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यात येईल. (४५ दिवस ही

एकावेळेस किंवा कर्मचाऱ्याच्या विनंतीनुसार रजा देण्यात येईल.) तसेच, प्रशिक्षण / अध्ययन / संशोधनासाठी प्रतिनियुक्ती अनुज्ञेय राहणार नाही.

त. परिचारीकांच्या वैयक्तिक व्यवसायिक विकासाकरीता पीएचडी नर्सिंग प्रवेश नियमावलीनुसार पीएचडी नर्सिंग उत्तीर्ण परिचारीकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे सदर शिक्षणाची सेवांतर्गत पदोन्नती तसेच इतर लाभाकरीता सेव जेष्ठता डावलून मागणी करता येणार नाही. तसेच पीएचडी नर्सिंग या प्रशिक्षणाची वेगळी सेवाज्येष्ठता यादी तयार होणार नाही.

द. राज्याच्या परिचर्या, ज्या राज्यामधील शैक्षणिक संस्था/विद्यापीठ या मधून पीएचडी (नर्सिंग) करीत असतील त्या राज्याच्या नर्सिंग कॉन्सिलकडेही पीएचडी (नर्सिंग) चे अतिरिक्त अर्हता (Additional qualification) नोंदणी करावी व तद्नंतर ही महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई यांचेकडे अतिरिक्त अर्हता (Additional qualification) म्हणून नोंदणी करणे अनिवार्य असेल. यास्तव, जे विद्यापीठ/महाविद्यालय पीएचडी सेंटर महाराष्ट्र परिचर्या परिषद यांचेशी संलग्न असेल अशाच मान्यताप्राप्त संस्थेमध्ये पीएचडी (नर्सिंग) करण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी.

ध. UGC आणि INC यापैकी किमान एकाचे संलग्नता (Affiliation) असणे बंधनकारक आहे.

न. पीएचडी नर्सिंग हे परिचर्या व्यवसायातील उच्चतम प्रशिक्षण आहे त्याकरीता सदर प्र शि क्षण हे गुणवत्तापूर्ण पध्दतीने पूर्ण करणे अपेक्षित आहे.

प. सद्य:स्थितीत महाराष्ट्रात मुबलक प्रमाणात युजीसी मान्यता प्राप्त विद्यापीठे (University) उपलब्ध आहेत. त्यानुषंगाने, विभागातील कर्मचाऱ्यांनी शक्यतो महाराष्ट्र राज्यातून पीएचडी नर्सिंग करणे बंधनकराक राहील. केवळ, अत्यंत 'अपवादात्मक परिस्थितीत बाहेरच्या राज्यातील विद्यापीठांना परवानगी देण्याबाबत विचार व्हावा.

वरील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करुन पीएचडी नर्सिंग पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकात नोंद घेण्यात यावी आणि कार्यालयात Dr. (Doctorate) लावण्याची अनुमती (Prefix) देण्यात यावी.

Archana

(अर्चना वालझाडे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीस्तव,**

१. उपसंचालक (शुश्रुषा) आरोग्य सेवा, मुंबई.

२. निवडनस्ती कार्यासन (सेवा-५)